# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½ ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in  वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


**उच्च व तंत्रशिक्षण विभाग.** **धारिका क्रमांक : १५(१)(६४)/१८७/सात-अ** **जाहिरात क्रमांक - ०९/२०१६**

आयोगामार्फत **प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सेवा, गट-अ** पदावरील सरळसेवा भरतीसाठी **ऑनलाईन** पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदासाठी खालील अटी व अर्हतांची पूर्तता करणारे उमेदवार अर्ज करू शकतात.

**२. चालू आरक्षणाची व अनुशेषाची पदसंख्या खालीलप्रमाणे:-**

| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | एकूण मागासवर्गीय | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १▼ | १▼ | १▼ | -- | -- | -- | -- | २ | ५ | ६ | ११ |
| **रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक /समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे.** | | | | | | | | | | | |
| **सर्वसाधारण** | १▼ | १▼ | १▼ | -- | -- | -- | -- | १ | ४ | ४ | ८ |
| **अ) महिला(३०%)** | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ | २ | ३ |
| **ब) खेळाडू (५%)** | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| **क) अपंग (३%)** | -- | | | | | | | | | | |

(▼ अनुशेषाची पदे)

(१) वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

(२) वि.जा.(अ) या वर्गवारीसाठी आरक्षित पदावर योग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास महाराष्ट्र लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम, २००१, मधील अंतर्गत परिवर्तनीयतेच्या तरतुदीनुसार भरण्यात येईल.

(३) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक अपंग/२०११/(६/११)/ताशि-१, दिनांक- १४ जानेवारी, २०११ नुसार खालील अपंगत्व असलेले उमेदवार प्रस्तुत पदासाठी अर्ज करण्यास पात्र आहेत:-

(अ) **चलनवलनविषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू** (Locomotor Disability or Cerebral Palsy)

(ब) **अंधत्व किंवा क्षीणदृष्टी** (Blindness/Low Vision).

**३. वेतनश्रेणी-** रु ३७४००-६७००० + ग्रेड पे रु.१००००/-, **एकूण वित्तलब्धी अंदाजित रु. ८००००/-.**

**४. पात्रता :-**

४.१ भारतीय नागरिक.

४.२ **वय:**-(१) **दिनांक १ जून, २०१६** रोजी **५४** वर्षापेक्षा (मागासवर्गीयांसाठी **५९** वर्षापेक्षा ) जास्त नसावे.

४.३ **शैक्षणिक अर्हता व अनुभव :-**

**(A)** Bachelor's degree and Master's degree of appropriate branch in Engineering / Technology with First Class or equivalent either at Bachelor's or Master's level.

**OR**

Bachelor's degree and Master's degree of appropriate branch in Engineering / Technology with First Class or equivalent either at Bachelor's or Master's level And Ph.D. or equivalent in appropriate discipline in Engineering / Technology.

**AND**

**(B)** Minimum of 10 years relevant experience in teaching / research / industry out of which atleast 3 years shall be at the level of Head of Department or equivalent.

**Note (1) -** In case of Architecture, professional practice of 10 years as certified by the Council of Architecture shall also be considered valid.

**Note (2)** **a.** Equivalence for Ph.D. is based on publication of 5 international journal papers, each journal having a cumulative impact index of not less than 2.0, with incumbent as the main Author and all 5 publications being in the authors area of specialization.

**b.** In case of research experience, good academic record and books / research paper publications / IPR /patents record shall be required as deemed fit by the expert members of the Selection Committee.

**c.** If the experience in industry is considered, the same shall be at managerial level equivalent to head of the department with active participation record in designing, planning, executing, analyzing, quality control, innovating, training, technical books / research paper publications / IPR/patents/ etc. as deemed fit by the expert members of the Selection Committee.

d. For the post of Principal flair for management and leadership is essential as deemed fit by the expert members of the Selection Committee.

**शासन निर्णय क्रमांक संकिर्ण - २०१३-(४५/१३) तां.शि-२, दिनांक- २३ मे, २०१४ नुसार अभियांत्रिकी संबंधीत समकक्ष अर्हता विचारात घेण्यात येतील.**

**टीप- (१) प्रस्तुत पदाकरीता विहित विषयातील Master Degree in Engineering/Technology मधील शैक्षणिक अर्हता धारण केल्यानंतर अनुभवाची गणना करण्यात येईल.**

**(२) 'उमेदवारांनी शिकविण्याचा दावा केलेल्या अनुभवाच्या कालावधीच्या नियुक्तीस विद्यापीठाची अथवा टेक्नीकलबोर्डाची (लागू असेल त्यानूसार) मान्यता असल्याचे प्रमाणपत्र मुलाखतीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा तो अनुभव ग्राह्य धरता येणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.'**

**५.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, किमान असून, किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरिता पात्र असणार नाही.जाहिरातीस अनुसरून प्राप्त झालेल्या अर्जाची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टीने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता/अनुभव यांच्या आधारे किंवा अन्य योग्य निकष निश्चित करून, अथवा चाळणी परीक्षेद्वारे मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि / अथवा अनुभव शिथिल केला जाणार नाही. चाळणी परिक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येतील. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क,निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील सरळसेवा भरती अंतर्गत 'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना' मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**६. जे उमेदवार चुकीची माहिती सादर करतील त्यांना या व पुढील सर्व निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.**

**७. कर्तव्ये व जबाबदा-या:**- प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदा-या याबाबतचा तपशील आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

८. शुल्क : **१)** अमागास - रु. **५२३/-** **२)** मागासवर्गीय - रु. **३२३ /-**

**मागासवर्गीय उमेदवारांनी अराखीव पदांसाठीच्या आवश्यक अटी व शर्तींची पुर्तता ( उदा. वयोमर्यादा, परीक्षा शुल्क व अर्हता इत्यादी ) केल्यासच अशा उमेदवारांची अराखीव पदावर शिफारस करण्यात येईल.**

**९. अर्ज करण्याची पद्धत :-**

**९.१** प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

**९.२ पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज http://mahampsc.mahaonline.gov.in या वेबसाईटद्वारे दिनांक २६ फेब्रुवारी, २०१६ ते दिनांक १७ मार्च, २०१६ या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.**

**९.३** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या **http://mahampsc.mahaonline.gov.in** तसेच **www.mpsc.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**९.४** विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**९.५** आयोगाने निश्चित केलेले परीक्षा शुल्क खालील पद्धतीने भरता येईल :-
(१) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे (२) नेटबँकिंग (३) डेबिट कार्ड (४) क्रेडिट कार्ड. (५) संग्राम केंद्र /सीएससी (नागरिक सेवा केंद्र)

**९.६** **http://mahampsc.mahaonline.gov.in** येथे संग्राम केंद्र (ग्रामपंचायंतीमध्ये) आणि सीएससीची सूची उपलबध आहे.

**९.७** परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

(१) शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील " माझे खाते " या लिंक वर क्लिक करावे.

(२) "माझे खाते" या लिंक वर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर 'Unpaid' असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी 'Pay Now' अशी लिंक उपलब्ध असेल.

(३) " Pay Now " या लिंक वर क्लिक केल्यानंतर 3 पर्याय उपलब्ध होतील. 1. ऑनलाईन पेमेंट 2. नागरी सुविधा केंद्र 3. चलानद्वारे

(४) उमेदवार क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करु शकतील.

(५) नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुक्लाचा भरणा केला जाऊ शकतो. उपरोक्त कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

(६) उमेदवाराने चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुक्लाचा भरणा केला जाऊ शकतो.

(७) ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचे आहे असे उमेदवार अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

(८) परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर - उमेदवाराला परीक्षा केंद्राची निवड करणे आवश्यक आहे. त्याकरिता " माझे खाते "मधील आवश्यक पदाची निवड करावी. त्यानंतर " केंद्र निवडा " या पर्यायावर क्लिक करावे. सदर पर्यायांतर्गत निवडलेल्या केंद्राची क्षमता दर्शविली जाईल. जर केंद्राच्या क्षमतेइतक्या उमेदवारांचे अर्ज तत्पूर्वी प्राप्त झाले असतील, तर सदर केंद्र उपलब्ध नसून, दुसरे केंद्र निवडावे, असा संदेश प्राप्त होईल. केंद्राची निवड केल्यानंतर सेव्ह बटनावर क्लिक केल्यास केंद्र निवडीची व अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण होईल.

(९) जे उमेदवार भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्काचा भरणा करतील, असे उमेदवार शुल्क भरल्याच्या दिनांकाच्या दुस-या दिवशी केंद्र निवडीची प्रक्रिया करु शकतील. जर हा दुसरा दिवस कार्यालयीन सुट्टी अथवा रविवारचा असेल तर उमेदवार सदर कार्यवाही त्यानंतर लगेच येणा-या पुढील कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी करु शकतील.

**१०.** चाळणी परीक्षा घ्यावयाचे ठरल्यास सदर परीक्षेच्या अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर व परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेशप्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमेदवाराने परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**११.** परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**१२.** विकलांग व्यक्तींसाठी असलेल्या वयोमर्यादेचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी शासन निर्णय,सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि-२०१२/प्र.क्र.२९७/आरोग्य-६, दिनांक ६ ऑक्टोबर,२०१२ मधील आदेशानुसार SADM या नविन संगणक प्रणालीदवारे वितरीत करण्यात आलेले नवीन नमुन्यातील विकलांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

**१३.** समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**१४. उमेदवारांने मुलाखतीच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. सदर मूळ प्रमाणपत्रे मुलाखतीच्यावेळी सादर न केल्यास मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल, याची कृपया नोंद घ्यावी.**

**१५. विहित पध्दतीने अर्ज सादर करुन ऑनलाईन शुल्क भरण्याची कार्यवाही दिनांक १७ मार्च, २०१६ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.**

**१६. चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक १८ मार्च, २०१६ पर्यंत बॅकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : २६ फेब्रुवारी, २०१६**

**श्रीधर पाठक,**
**उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग.**